# ‘लैंगिकतेवरील प्रश्न तेच, उत्तरे मात्र अनेक‘

पुणे, दि. २० फेब्रुवारी २०२५ : “लैंगिकतेवरील प्रश्न जगभरात सारखेच आहेत, पण त्याची उत्तरे मात्र वेगवेगळी आणि सापेक्ष आहेत,” असे मत नॉर्वेजियन अभिनेता जॅन रॉइस यांनी आपल्या सेक्स (२०२४) सिनेमाच्या प्रदर्शनानंतर नंतर व्यक्त केले.

२३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)मध्ये दिग्दर्शक डॅग जोहान यांचा ‘सेक्स’ (२०२४) हा नॉर्वेतील चित्रपट दाखवण्यात आला. त्यानिमीत्त सिनेमातील मुख्य अभिनेते जॅन रॉइस यांनी संवाद साधला.

जॅन म्हणाले, “लैंगिकता या विषयावर बोलणे हे लोकांना खूप अवघडलेपणाचे वाटत असते. मात्र, त्यावर बोलणे देखील गरजेचे आहे. म्हणूनच, विषय कितीही अवघडलेपणाचा वाटत असला तरीही त्यावर बोलण्याची तितकीच गरज होती. ज्यासाठी आम्ही सिनेमा हे माध्यम निवडून ‘सेक्स’ ही कलाकृती लोकांसमोर आणली. कारण, हा विषय सगळीकडे सारखाच आहे. मग तो भारत असो वा नॉर्वे. मात्र, त्याची उत्तरे ठिकठिकाणी वेगवेगळी आहेत आणि व्यक्तिसापेक्ष आहेत. ज्यासाठी संवाद आवश्यक आहे. त्या संवादाची आवश्यकता ‘सेक्स’ ही कलाकृती अधोरेखित करते.”

समाजाची पुरूष या घटकाकडे पाहण्याची एक साचेबध्द मानसिकता असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. “पुरूष, पौरूषत्व, आज जसं अल्फा मेल ही संकल्पना आहे, मर्दासारखे बोलणे वगैरे हे सर्व एक स्टिरीओटाईप आहे, पण तसं असावंच हे गरजेचे नाही. असे जॅन रॉइस म्हणाले.

अभिनेता म्हणून अशा विषयावर काम करताना आलेला अनुभव देखील जॅन रॉइस यांनी मोकळेपणाने सांगितला. ज्यात त्यांनी सांगितले की, “एका सरळमार्गी जीवन व्यतीत करणाऱ्या आणि अचानक नकळतपणे समलैंगिक संबंधात येणाऱ्या व्यक्तीची भूमिका ही निश्चितच आव्हानात्मक होती. अनेकदा काही प्रसंग चित्रीत करताना पूर्वतयारी करावी लागायची, काही भावनिक प्रसंगांवेळी विशेष मानसिक स्थितीत जाणासाठी विविध कल्पनांचा आधार

घ्यावा लागायचा. मात्र, एक प्रेक्षक म्हणून जेव्हा सिनेमा पाहिला तेव्हा आपली मेहनत ही आपल्या भूमिकेला न्याय देऊ शकली आहे व पात्रामध्ये जिवंतपणा आहे हे पाहून समाधान वाटलं.

**मानवी स्पर्श आणि सहजतेला पर्याय नाही - टोरेस**

"एआयच्या वापरामुळे चित्रपट निर्मिती अधिक वेगवान आणि कार्यक्षम होत असली, तरी मानवी स्पर्श आणि सहजता आवश्यक आहे", असे मत प्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजिस्ट पॅको टोरेस यांनी सांगितले.

"एआयच्या साहाय्याने परिपूर्ण चित्रपट बनवण्यावर भर दिला, तर चित्रपटांमधील सहजता आणि नाविन्यपूर्णता कमी होईल," असा इशारा त्यांनी दिला.

तंत्रज्ञानाचा वापर कथानकाला अधिक प्रभावी बनवण्यासाठी कसा करता येईल, यावर भर द्यायला हवा, असे त्यांनी सांगितले.

चित्रपट निर्मितीच्या भविष्यावर बोलताना टोरेस यांनी एआयच्या संभाव्यतेवर आणि त्याच्या मर्यादांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, "एआय हे एक साधन आहे, ते निर्मात्याची जागा घेऊ शकत नाही. माणसाची कल्पकता आणि भावना एआयमध्ये नसतात. चित्रपटांमध्ये मानवी अनुभव आणि भावना पोहोचवणे महत्त्वाचे आहे, आणि ते काम एआय करू शकत नाही."

"एआयच्या मदतीने स्क्रिप्ट रायटिंग, एडिटिंग आणि प्रेक्षकांच्या आवडीनिवडीचा अंदाज घेणे शक्य आहे. पण चित्रपटाची मूळ कल्पना आणि निर्मिती मानवी कल्पकतेवरच आधारित असली पाहिजे, असे टोरेस यांनी स्पष्ट केले.

आगामी काळात क्वांटम कम्प्युटिंगमुळे चित्रपट निर्मितीत मोठी क्रांती होईल, असा विश्वास टोरेस यांनी व्यक्त केला. तंत्रज्ञानातील बदलांना स्वीकारण्याची आणि त्यांचा योग्य वापर करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

**'डार्केस्ट मिरीयम'**

नायोमी जाये दिग्दर्शित 'डार्केस्ट मिरीयम' या चित्रपटाने सिनेरसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. भारतामध्ये हा चित्रपट प्रथमच प्रदर्शित झाला. मार्था बेली यांच्या 'द इन्सिडंट रिपोर्ट' या पुस्तकावर आधारित ही कथा आहे. वडिलांच्या अकाली

निधनाने खचलेली मिरियम नावाच्या एका ग्रंथपाल स्त्रीची ही हृदयस्पर्शी कहाणी आहे. टोरंटोमधील एका शांत लायब्ररीत काम करणारी मिरियम, तिच्या आयुष्यात आलेल्या दुःखाच्या गर्तेतून बाहेर पडण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे. एकीकडे तिच्या वडिलांच्या मृत्यूचा तिला सतत त्रास होत आहे, तर दुसरीकडे तिला काही रहस्यमय आणि धमकीवजा पत्रे मिळत आहेत, ज्यामुळे तिच्या अडचणींमध्ये आणखी भर पडते. या पत्रांमुळे तिची मानसिक स्थिती आणखीनच बिघडते.
अशा परिस्थितीत, मिरियमच्या आयुष्यात जान्को नावाचा एक टॅक्सी ड्रायव्हर येतो, जो मूळचा स्लोव्हेनियाचा असतो. त्यांच्यात हळू हळू मैत्री आणि नंतर प्रेम निर्माण होते. जान्कोच्या सहवासाने मिरियमच्या जीवनातील अंधार काहीसा कमी होतो, तिला एक नवीन आशा मिळते. पण त्या अनामिक पत्रांचे रहस्य काय आहे? मिरियम या सगळ्या परिस्थितीतून कशी बाहेर पडते? या प्रश्नांची उत्तरे चित्रपटात मिळतात.

दिग्दर्शिका नायोमी जाये यांनी चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेविषयी बोलताना अनेक गोष्टी सांगितल्या. त्या म्हणाल्या, की चित्रपटातील दृश्यात्मकता आणि संगीत या दोन गोष्टींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.
छायाचित्रकाराने नायिकेच्या वेदनेला अत्यंत प्रभावीपणे पडद्यावर साकारले आहे. ऑपेरा 'रिगोलट्टो' या संगीतामुळे चित्रपटाच्या गंभीर वातावरणाला एक खास रंगत येते. संगीतकार आणि दिग्दर्शिका यांच्या अनेक बैठका आणि चर्चांमधून चित्रपटासाठी योग्य संगीत निवडण्यात आले.